मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# दुकाने गोदामांचा प्रश्न ऐरणीवर!

## पूर्णानगरमधील आगीत चार जणांचा गुदमरून मृत्यू

**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी ।**

पूर्णानगरमधील आगीत चार जणांचा गुदमरून मृत्यू झाल्याने अनधिकृत दुकानांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील बहुतांशी दोन मजली दुकानाच्या पोटमाळ्यावर अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली असून, पोटमाळ्याचा वापर राहण्यासाठी किंवा इतर कामासाठी केला जात आहे. हा प्रकार पूर्णतः अनधिकृत असून, महापालिकेने ज्या कामासाठी परवाना दिलेला आहे. त्याच कामासाठी त्याचा उपयोग होणे गरजेचे आहे. तरच अशा घटना टाळता येतील, असे पिंपरी-चिंचवड महापालिका आपत्ती व्यवस्थापन विभागाचे म्हणणे आहे. पूर्णानगर येथे बुधवारी पहाटे दुकानाला लागलेल्या आगीत दुकानाचे मालक चिमणाराम चौधरी त्यांच्या पत्नी नम्रता, मुलगा भावेश आणि सचिन यांना आपले प्राण गमवावे लागले. दोन मजली दुकानावर पोटमाळा टाकून ते दुकानाच्या वरच्या भागात राहत होते. मात्र, दुकानातून बाहेर येण्या-जाण्यासाठी एकच मार्ग होता. तर घरच्यांना वर जाण्यासाठी पार्किंगच्या बाजूने एक वेगळे शटर होते. परंतु तेही बंद होते. दुकानातील पेंटिंगच्या डब्यांमुळे व रसायनांमुळे आगीने थोड्याच वेळात तीव्र स्वरूप धारण केले. कोणताही मोठा व्यवसाय करीत असताना स्वतःच्या सुरक्षेबाबत काळजी घेणे गरजेचे आहे. आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास बाहेर पडण्यासाठी दुसरा दरवाजा



> **दुमजली दुकाने पोटमाळा बनवून त्याचा उपयोग घरगुती वापरासाठी किंवा राहण्यासाठी करणे अयोग्य आहे. ते अनधिकृत आहे. तसेच अशा दुकानांना आपत्कालीन स्थिती उद्भवल्यास पर्यायी मार्ग किंवा मोठी खिडकी असणे आवश्यक आहे.**
> **- यू. एम. वानखेडे,**
> **उपअग्निशमन अधिकारी, पिंपरी-चिंचवड महापालिका**

अथवा मोठ्या खिडकीसारखा मार्ग असणे आवश्यक आहे. तसे असते तर चौधरी कुटुंब वाचू शकले असते, असे आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. कुदळवाडी येथे पुढील बाजूस दुकान आणि मागे किंवा दुकानाच्या वरच्या जागेत अनेक व्यावसायिक राहण्यास आहेत. येथील भंगाराच्या गोदामात शेकडो कामगार राहतात. या गोदामांना चिंचोळा एकच मार्ग असतो. त्यामुळे तेथेही आगीची दुर्घटना घडल्यास मोठी जीवित हानी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. पिंपरी-चिंचवड शहरात अनेक ठिकाणी दोन मजली दुकानांमध्ये अनधिकृत बांधकाम करून किंवा पोटमाळा काढून व्यवसाय केले जातात.

हा प्रकार पूर्णतः अनधिकृत असल्याचे महापालिकेच्या बांधकाम परवाना विभागाचे म्हणणे आहे. घर भाड्याचे पैसे वाचले जावेत, जास्तीत जास्त वेळ दुकान सुरू ठेऊन व्यवसाय करता यावा, हा त्यामागील उद्देश असतो. मात्र, व्यवसाय करताना स्वतःची सुरक्षा ही बाब अत्यंत महत्वाची आहे. त्याचबरोबर शहरात गुंठा अर्धा गुंठा जागा घेऊन अनधिकृत बांधकामे करण्यात आलेली आहेत. सध्या मोठ्या प्रमाणात अशी बांधकामे करण्याचा सपाटा या भागात सुरू आहे. मात्र, अर्ध्या किंवा एक गुंठ्यात चार ते पाच मजली बांधकाम करताना कोणत्याही प्रकारची खबरदारी घेतली जात नाही. पूर्णानगर येथील घटनेबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी शोक व्यक्त केला आहे. कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी असल्याची भावनाही त्यांनी व्यक्त केली. या दुर्घटनेचे वृत्त समजताच आयुक्त सिंह आणि अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी घटनास्थळाला भेट दिली आणि परिस्थितीचा आढावा घेतला.

# सफाई कर्मचारी बांधवांसोबत रक्षाबंधन!

## वर्षा जगताप यांच्या संकल्पनेतून रक्षाबंधन

**पिंपरी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

राष्ट्रवादी युवती काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने संत तुकाराम नगर या ठिकाणी सफाई कर्मचारी बांधवांसोबत रक्षाबंधन साजरा करण्यात आला. राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या अध्यक्षा वर्षा जगताप यांच्या संकल्पनेतून हा सण साजरा करण्यात आला. वर्षा जगताप म्हणाल्या की, राखी हे विश्वासाच प्रतिक आहे. हाच विश्वास मनात ठेवून राष्ट्रवादी युवती काँग्रेस पिंपरी चिंचवड शहर जिल्हा यांच्या वतीने पिंपरी चिंचवड शहरात ज्यांना एकही दिवस सुट्टी नसते आणि स्वताच्या



जीवाची पर्वा न करता खरंतर कठिण काळातही दिवसरात्र प्रामाणिकरित्या अविरतपणे जे कार्य करत असतात असे सर्वांचे बंधू सफाई कर्मचारी त्यांच्यासाठी हा आजचा सण त्यांच्या सोबत साजरा करण्यात आला. त्यांचे देखिल समाजात एक महत्वाचे स्थान आहे, हे महत्व पटवून देण्याचा हा एक छोटासा प्रयत्न युवतींनी केला. आजचा रक्षाबंधन हा सण अनोख्या पद्धतीने संत तुकाराम नगर या ठिकाणी साजरा करण्यात आला. यावेळी नितीन तुपे सर, विकी भोले, अनिल शिंदे, चंद्रकांत शिंदे, अर्जुन भादवे ह्या सफाई कर्मचारी यांच्या उपस्थितीत व मेहेक इनामदार, मेघना जगताप, वैष्णवी आदी युवतींनी सहभाग घेतला.

# अठ्ठावीस शाळा मुख्याध्यापकां विना!

**पिंपरी।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महापालिकेच्या शाळेत अगोदरच शिक्षकांची संख्या कमी असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. त्यापाठोपाठ आता महापालिकेच्या २८ शाळांमध्ये पूर्णवेळ मुख्याध्यापक नसल्याची बाब समोर आली आहे. परिणामी, या शाळांवर आता प्रभारी मुख्याध्यापक नेमण्यात आले असून, त्यांच्यावरच मुख्याध्यापकांची जबाबदारी देण्यात आली आहे. प्रभारी पदाला फारसे महत्त्व नसल्याने हे पद असून, नसल्यासारखेच आहे. त्यामुळे शाळेच्या व्यवस्थापनावर या प्रभारीपदाचा परिणाम होत आहे. महापालिकेच्या १०५ शाळा आहेत. त्यापैकी मराठीच्या शाळांसाठी मुख्याध्यापकांची ९५ पदे मंजूर असताना फक्त ६७ मुख्याध्यापक कार्यरत असून २८ पदे रिक्त आहेत. अनेक शाळांना मुख्याध्यापक नसल्याने आणि शिक्षकांची संख्या कमी असल्याने त्याठिकाणी शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी अडचणी येत आहेत, नियमाप्रमाणे शंभरपेक्षा अधिक पटसंख्या असलेल्या शाळेत मुख्याध्यापक असणे बंधनकारक आहे. तरी या शाळांवर आता प्रभारी मुख्याध्यापक नेमण्यात आले आहेत.

# लम्पी आजाराच्या अटकावासाठी पशुवैद्यकीय पथकांची नेमणूक..!

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

## पशुवैद्यकीय डॉक्टर आणि त्यांचे संपर्क क्रमांक जाहीर

पिंपरी चिंचवड महानगर पालिका कार्यक्षेत्रात गाय व बैलांमध्ये लम्पी त्वचा आजाराचा प्रसार होत असल्याचे दिसून येत आहे. प्रामुख्याने गायींमध्ये या आजाराचा प्रसार होत असून हा प्रादुर्भाव रोखण्याकरिता आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत.

प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लसीकरण करणे व बाधीत जनावरांना वेळोवेळी उपचाराच्या सुविधा देण्याच्या अनुषंगाने पशुवैद्यकीय पथकांची नेमणूक करुन योग्य रीतीने कामकाज करण्याच्या सूचना उपआयुक्त संदिप खोत यांनी पशुवैद्यकीय विभागाला दिल्या आहेत. शहरातील लंपी आजाराने बाधित गुरांची संख्या रोखण्यासाठी महानगर पालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने तीन पथकांची नेमणूक केली असून प्रत्येक पथकामध्ये वैद्यकीय अधिकारी, मदतनीस आणि एक पशुधन पर्यवेक्षक असणार आहेत. या पथकांद्वारे महापालिकेच्या आठ विभागीय क्षेत्रामध्ये



महत्त्वपूर्ण दक्षता घेण्यात येणार आहे. या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने राज्य पशुसंवर्धन विभागाकडून गोटपॉक्स लसीचे १००० डोस उपलब्ध करून घेतले असून आणखी डोस देण्याची मागणी ही केली आहे. यावेळी खोत म्हणाले, सध्या लसीकरण प्रक्रिया जलद गतीने सुरु असून ४०० गुरांचे लसीकरण पूर्ण करण्यात आले आहे. भटक्या गुरांमध्ये लंपी संसर्गाचा प्रसार रोखण्यासाठी महापालिकेच्या वतीने

### कामकाजाचा अहवाल सादर करावा

» वरील नमुद केलेल्या पथक १ ते पथक ३ मधील कर्मचा-यांनी लम्पी आजाराचे उपचार व लसीकरणाचे कामकाज करावे. तसेच आवश्यकतेनुसार उपचाराचे कामकाज करुन पशुवैद्यकीय अधिका-यांकडे दररोज कामकाजाचा अहवाल सादर करावा. या दरम्यान अधिकारी व कर्मचारी यांनी गैरहजर राहू नये तसेच सदर कालावधीतील रजा मंजुर केली जाणार नाही, अशा ही सूचना उप आयुक्त खोत यांनी दिल्या आहेत.

विलगीकरण कक्षांची स्थापना करण्यात येणार आहे. पशुवैद्यकीय विभागाने खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टरांना लंपी आजाराबाबत त्वरित अहवाल सादर करण्याचे आवाहन केले आहे. अहवाल सादर झाल्यानंतर वेळेत उपचार सुरु करण्यात येतील. तसेच लम्पी रोगाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी तिन्ही पथकांसोबत सहयोगी खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टर आणि त्यांचे संपर्क क्रमांकही देण्यात आले आहे.

# ३१४ कोटींचा कपाट खरेदी घोटाळा..!

**पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्सप्रेस मराठी।**

## कामगार नेते बाबा कांबळे यांचा पुराव्यानिशी आरोप..

गोरगरीब, कष्टकरी, बांधकाम मजुरांसाठी स्थापन करण्यात आलेल्या रस्ते व बांधकाम कल्याणकारी महामंडळामध्ये ३१४ कोटी कपाट खरेदी टेंडरमध्ये घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. यापूर्वी देखील मध्यान भोजन योजना, बोगस लाभार्थी योजनासह इतर विविध योजनेमध्ये १००० करोड रुपयांचा घोटाळा झाल्याचे आरोप झाले होते' परंतु याची चौकशी न झाल्यामुळे व संबंधित घोटाळ्यातील कोणावरही कारवाई झाली नाही. परंतु, आता मात्र, पुन्हा एकदा ३१४ कोटींच्या टेंडरमध्ये मोठा घोटाळा झाल्याचे पुराव्यानिशी आरोप करण्यात आले आहेत. अडीच लाख रुपये किमतीचे कपाट पंधरा लाखापेक्षा अधिक किमतीमध्ये खरेदी करण्यात आले आहेत. हे सर्व प्रकरण अत्यंत गंभीर असून गोरगरीब कष्टकरी बांधकाम मजुरांसाठी स्थापन करण्यात आलेल्या बांधकाम मजुरांच्या कल्याणकारी मंडळामध्ये अशा प्रकारे लाखो करोडोंचे घोटाळे होणं हे अत्यंत दुर्दैवी व बांधकाम मजुरांच्या टाळूवरील लोणी खाण्याचा प्रकार आहे. या सर्व प्रकरणाची ताबडतोब चौकशी करून यातील दोषीवर कारवाई करून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी कष्टकरी कामगार पंचायतचे



अध्यक्ष, कष्टकऱ्यांचे नेते बाबा कांबळे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. तशा प्रकारचे पत्रदेखील संघटनेच्या वतीने देण्यात आले असून अन्यथा महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील यावेळी बाबा कांबळे यांनी दिला आहे. कष्टकरी कामगार बांधकाम मजुरांचे प्रश्न दिवसेंदिवस अत्यंत बिकट होत असून पिंपरी चिंचवड, पुणे, मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये बांधकाम मजुरांचे सातत्याने अपघात होत आहेत. तसेच त्यांना शासनाच्या योजनांचा लाभ होत नाही व बोगस लाभार्थी मात्र या योजनेचा लाभ घेत आहेत. खऱ्या लाभार्थ्यांना मात्र, दुर्लक्षित ठेवले जात आहे. पुणे, मुंबईमध्ये बांधकाम मजुरांच्या अनेक दुर्दैवी घटना घडल्या असून त्यामध्ये अनेक बांधकाम मजुरांचे जीव देखील गेलेला आहे, असे असताना बांधकाम मजुरांच्या कल्याणासाठी उपलब्ध असलेला निधी हा बांधकाम मजुरांवरच खर्च करण्याऐवजी या

### ताबडतोब चौकशी करावी!

» या सर्व प्रकरणाची गंभीर दखल घेऊन बांधकाम मजुरांच्या कल्याणकारी मंडळामध्ये झालेल्या घोटाळ्याची ताबडतोब चौकशी करावी, अशी मागणी यावेळी कष्टकरी कामगार पंचायतच्या वतीने निवेदनाद्वारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करण्यात आली आहे. याबरोबरच बांधकाम मजुरांमध्ये याबाबत जागृती व्हावी व त्यांच्या योजनांचे हक्काचे पैसे इतरत्र वापरले जात आहेत; याबद्दल बांधकाम मजुरांमध्ये जनजागृती करणार असल्याची माहिती बाबा कांबळे यांनी दिली.

निधीचा दुरुपयोग सुरू असून या निधीचा इतर विविध कामासाठी उपयोग केला जात आहे. त्यामध्ये हॉस्पिटल बांधणे, इमारती बांधणे, कपाट खरेदी करणे व इतर विविध कारणांसाठी या निधीचा उपयोग केला जात आहे. मुळात हा निधी बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी व त्यांच्या योजनासाठी राबवला जावा; ही महत्त्वाची भूमिका दुर्लक्षित झालेली आहे.

# लोकसभेसाठी पुण्यात भाजपचा नवा गडी!

## मुरलीधर मोहोळांचा पत्ता होणार कट?

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** राजकीय पक्षांकडून आगामी लोकसभा निवडणूक २०२४ च्या तयारीला सुरूवात करण्यात आली आहे. जवळपास सर्वच राजकीय पक्ष निवडणूकीची रणनिती आखण्यात गुंतले आहेत. यादरम्यान पुण्यात लोकसभा निवडणूकीत भाजपचा उमेदवार कोण असेल यावरून राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. यातच पुणे लोकसभा मतदार संघाच्या उमेदवारीसाठी आणखी एक नवीन नाव पुढे आले आहे. पुणे लोकसभा मतदारसंघात भाजपचं नेतृत्व कोण करणार यावरून अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. यामध्ये माजी महापौर मुरलीधर मोहोळ, माजी आमदार जगदीश मुळीक, माजी राज्यसभा खासदार संजय काकडे आणि दिवंगत भाजप नेते गिरीष बापट यांच्या सूनबाई स्वरदा बापट यांची नावे उमेदवारीसाठी चर्चेत आहेत. मात्र आता पुणे लोकसभेसाठी उमेदवार म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी प्रचारक आणि भाजपचे माजी राष्ट्रीय सचिव



सुनिल देवधर यांचं नाव पुढे आलं आहे. सुनिल देवधर हे पुण्यातून लोकसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक असल्याची माहिती समोर आली आहे. देवधर यांच्याबद्दल भाजपचे राष्ट्रीय नेतृत्व देखील गंभीररित्या विचार करत असल्याची माहिती आहे.

याबद्दलचे वृत्त दिले आहे. पुण्यात जन्मलेल्या सुनिल देवधर यांनी १२ वर्ष राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून काम केलं आहे. इशान्य भारतात देखील त्यांचा चांगला जनसंपर्क आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणूकीत नरेंद्र मोदी यांच्या वाराणसी मतदार संघाची जबाबदारी देखील देवधर यांनी सांभाळली होती. या निवडणूकीत मोदी यांना विक्रमी मताधिक्याने विजय झाला होता. २०१८ साली भाजपच्या त्रिपुरा येथील विजयात देखील देवधर यांचा मोठा वाटा होता.

**दररोज सव्वा लाख वाहनांची ये-जा**

**» पुणे लोकसभा मतदारसंघात भाजपचं नेतृत्व कोण करणार यावरून अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. यामध्ये माजी महापौर मुरलीधर मोहोळ, माजी आमदार जगदीश मुळीक, माजी राज्यसभा खासदार संजय काकडे आणि दिवंगत भाजप नेते गिरीष बापट यांच्या सूनबाई स्वरदा बापट यांची नावे उमेदवारीसाठी चर्चेत आहेत.**

# वाहतूक नियमभंगाचा बनावट संदेश; सायबर चोरट्यांची नवी शक्कल!

## सावध राहण्याचे पोलिसांचे आवाहन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** सामान्यांची फसवणूक करण्यासाठी चोरटे नवनवी शक्कल लढवत असतात. सायबर चोरट्यांनी आता वाहतूक नियमभंग दंडाचा बनावट संदेश तयार केला असून, बनावट संदेश समाजमाध्यमात प्रसारित करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. वाहनचालकांनी अशा प्रकारच्या संदेशास प्रतिसाद देऊ नये, तसेच चोरट्यांपासून सावध रहावे, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे. सायबर चोरटे नागरिकांनी फसवणूक करण्यासाठी नवनवी शक्कल लढवितात. समाजमाध्यमात झालेल्या ओळखीतून भेटवस्तू पाठविण्याचे आमिष, स्वस्तात दुचाकी, गृहोपयोगी वस्तू विक्री, ऑनलाइन टास्क, नोकरीचे आमिष दाखवून चोरटे नागरिकांना जाळ्यात ओढतात. गेल्या काही



> **“सायबर चोरट्यांनी थकीत दंडाचा बनावट संदेश प्रसारित केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर याबाबतची माहिती सायबर गुन्हे शाखेला कळविण्यात आली आहे. नागरिकांनी बनावट संदेशाला प्रतिसाद देऊ नये. असे प्रकार आढळून आल्यास त्वरीत पोलिसांकडे तक्रार द्यावी.**
>
> **-विजयकुमार मगर, पोलीस उपायुक्त, वाहतूक शाखा**

वर्षांपासून सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवरील थकीत दंडाचे प्रमाण मोठे आहे. चोरट्यांनी नेमकी ही बाब हेरून आता वाहतूक नियमभंग दंडाचा बनावट संदेश प्रसारित करण्यास सुरुवात केली आहे. वाहतूक नियमभंग दंडाच्या संदेशात सायबर चोरट्यांनी एक लिंक पाठविली आहे. या लिंकमधील शब्दात फेरफार करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या संदेशाला प्रतिसाद दिल्यास फसवणूक होण्याची शक्यता आहे. याबाबत वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विजयकुमार मगर म्हणाले, ‘थकीत दंडाचा अधिकृत संदेश पोलिसांकडून पाठविण्यात येतो. या संदेशात छायाचित्र नसते. चोरट्यांनी संदेशात लिंक पाठविली आहे. या लिंकमधील शब्दात फेरफार करण्यात आला आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या संदेशाला प्रतिसाद देऊ नये.’ सायबर चोरटे वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखवून नागरिकांची फसवणूक करतात. समाजमाध्यमातील संदेशावर विश्वास ठेऊ नये, असे सायबर गुन्हे शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मीनल सुपे-पाटील यांनी नमूद केले.

# मेट्रो अन् पीएमपीसाठी एकच तिकिटाचा प्रस्ताव

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** मेट्रो स्थानकापर्यंत नागरिकांना पोहचण्यासाठी पीएमपीच्या फिडर बससेवेचा विस्तार केला जाणार आहे. त्यासाठी महापालिकेतर्फे ३०० इ-बस भाड्याने घेण्याची प्रक्रिया सुरु आहे. या मार्गावर प्रवास करणाऱ्या नागरिकांना मेट्रो आणि पीएमपीसाठी एकच तिकीट असणार आहे. त्याबाबतचा निर्णय उद्या (ता. ३१) पीएमपीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत होण्याची शक्यता आहे. शहरातील मेट्रोच्या मार्गाचे वनाज ते रूबी हॉल क्लिनिक आणि पिंपरी ते शिवाजीनगर न्यायालय या दरम्यान सेवा सुरू झाली. या दोन्ही मार्गावर दैनंदिन प्रवाशांची संख्या ३५ हजारापर्यंत गेली आहे. या दोन्ही मार्गावर सात स्थानकासाठी सध्या पीएमपीची एका तासाला एक बस अशी फिडर सेवा सुरू करण्यात आली आहे. पण बसची वारंवारिता कमी असल्याने त्याचा लाभ मर्यादित आहे. मेट्रोच्या प्रवाशांची संख्या वाढावी यासाठी स्थानकाच्या चार किलोमीटरच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना पीएमपीची बस सेवा उपलब्ध व्हावी यासाठी नियोजन केले जात आहे. पुणे महापालिकेकडून १५व्या वित्त आयोगातून महापालिकेला हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी निधी मिळाला आहे. त्यातून सात मीटर रुंदीच्या ३०० इ बस घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याची निविदा प्रक्रिया सध्या सुरू आहे.

शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी एकच तिकीट असावे यादृष्टीने महामेट्रोने ‘पुणे कार्ड’ सुविधा सुरु केली आहे. याचा वापर सध्या मेट्रोसाठी केला जात आहे. याच कार्डचा वापर पीएमपी बससाठी केल्यास फिडर सेवेचा वापर करणाऱ्या प्रवाशांना दरवेळी तिकीट न काढता एकाच तिकिटात प्रवास करता येणार आहे अशी घोषणा यापूर्वी झालेली आहे. पण अद्याप त्याची अंमलबजावणी झालेली नाही. यासंदर्भातील प्रस्ताव गुरुवारी होणाऱ्या पीएमपीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत येणार आहे.आयुक्त विक्रम कुमार म्हणाले, ‘मेट्रो स्टेशनच्या चार किलोमीटरच्या परिघात पीएमपीच्या फिडरसेवेचा विस्तार करण्यासाठी महापालिका ३०० इ बस भाड्याने घेत आहे.

# राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला २ कोटी ७१ लाख भरण्याचे आदेश!

## महामार्गाच्या चौपदरीकरणादरम्यान तोडली होती झाडे

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जुन्या पुणे ते नाशिक आणि सध्याच्या खेड ते सिन्नर महामार्गाच्या चौपदरीकरणा दरम्यान तोडलेली झाडे लावणे, त्यांचे संगोपन आणि संरक्षण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला (एनएचएआय) दोन कोटी ७१ लाख रुपयांची रक्कम भरण्याचे आदेश राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) दिला आहे. सामाजिक न्याय विभागाकडे ही रक्कम वर्ग करून त्यांच्यामार्फत झाडे लावण्यात येणार आहेत. या संदर्भात पुण्याच्या एनजीटीचे न्यायिक सदस्य दिनेश कुमार सिंग आणि तज्ज्ञ सदस्य डॉ. विजय कुलकर्णी यांच्या खंडपीठाने निर्णय दिला आहे. पुणे - नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणात २०१४ साली संगमनेर तालुक्याचे तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी २९ प्रकारच्या झाडे तोडण्याची परवानगी दिली होती. ती परवानगी देताना त्यांनी प्रत्येक झाडामागे १० पट झाडे येणाऱ्या पावसाळ्यात लावावीत असे म्हटले होते. त्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने याचिकाकर्ते गणेश बोऱ्हाडे यांनी २०२० मध्ये एनजीटीत याचिका दाखल केली होती. खेड ते सिन्नर महामार्गा दरम्यानची




झाडे तोडण्यासंदर्भात न्यायाधिकरणाने त्रिसदस्यीय समिती स्थापन केली. त्या समितीत वन विभागाच्या दोघांसह एनएचएआयच्या एका सदस्याचा समावेश होता. वन विभागाच्या सदस्यांनी यांनी खेड ते सिन्नर या महामार्गाची पाहणी केली. त्यावेळी वन्यजीव प्राण्यांना रस्ता ओलांडण्यासाठी अंडरपास, बायपास नसल्याचे निदर्शनास आले होते. त्याशिवाय रस्त्यावरील झाडे तोडल्याचे निदर्शनास आले. त्याबाबत या त्रिसदस्यी समितीने न्यायाधिकरणाला अहवाल दिला. त्या अहवालात याचिकाकर्त्याने मांडलेल्या काही गोष्टींना दुजोरा देणाऱ्या बाबी मांडल्या. त्याशिवाय सुमारे २७ हजार ३८ झाडे लावण्याची शिफारसही केली. राज्यातील सर्व राष्ट्रीय महामार्गांवरील तोडलेल्या झाडांच्या बदल्यात दुसरी झाडे लावण्यासाठीचा निधी हा एनएचएआयने द्यावा. तसेच झाडांचे रोपण, संगोपन आणि संरक्षण हे सामाजिक वनीकरण या विभागाने करावे, असेही मत नोंदविले होते.

### प्रत्येक झाडामागे १० पट झाडे

» पुणे - नाशिक रस्त्याच्या चौपदरीकरणात २०१४ साली संगमनेर तालुक्याचे तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांनी २९ प्रकारच्या झाडे तोडण्याची परवानगी दिली होती. ती परवानगी देताना त्यांनी प्रत्येक झाडामागे १० पट झाडे येणाऱ्या पावसाळ्यात लावावीत असे म्हटले होते. त्या आदेशाची अंमलबजावणी न झाल्याने याचिकाकर्ते गणेश बोऱ्हाडे यांनी २०२० मध्ये एनजीटीत याचिका दाखल केली होती.

# राखी पौर्णिमेला पोलिसांची अनोखी भेट!

## दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांना पकडले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** राखी पौर्णिमेच्या दिवशी दागिने हिसकावणाऱ्या पाच चोरट्यांना पर्वती पोलिसांनी पकडले. त्यांच्याकडून पाच गुन्हे उघडकीस आले असून, सात लाखांचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

चोरट्यांविरुद्ध जळगाव, अकोला, पुणे, अमरावती शहरात दागिने हिसकावण्याचे ३० गुन्हे दाखल आहेत. राखी पौर्णिमेला दागिने हिसकावणाऱ्या चोरट्यांना पकडून पोलिसांनी अनोखी भेट दिली. आकाश ज्ञानेश्वर सूर्यवंशी (वय २५, रा. दत्तनगर, कात्रज), लोकेश मुकुंदा महाजन (वय २४), प्रसाद उर्फ परेश संजय महाजन (वय २५), संदीप अरविंद पाटील (वय २८), दिपक रमेश शिरसाठ (वय २५ , सर्व रा. जळगाव) अशी अटक केलेल्या चोरट्यांची नावे आहेत. रिक्षा प्रवासी महिलेचे दागिने पर्वती भागातून हिसकावून नेल्याची घटना २४ ऑगस्ट रोजी घडली होती. याचदिवशी सदाशिव पेठेत पादचारी महिलेचे दागिने दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेले होते. या गुन्ह्याचा तपास पर्वती पोलिसांकडून करण्यात येत होता.



सहायक पोलीस आयुक्त अप्पासाहेब शेवाळे यांनी तपास पथकांना चोरट्यांचा माग काढण्याचे आदेश दिले होते.

पोलीस उपनिरीक्षक सुनील जगदाळे, चंद्रकांत कामठे यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले होते. पोलीस कर्मचारी किशोर वळे यांना चोरट्यांच्या माहिती मिळाली. चोरटे शिवाजीनगर भागातून प्रवासी बसने जळगावला पसार होण्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा लावून चोरट्यांना ताब्यात घेण्यात आले.

चोरट्यांनी भारती विद्यापीठ, बिबवेवाडी, सहकारनगर, विश्रामबाग पोलीस ठाण्यांच्या हद्दीत महिलांचे दागिने हिसकावल्याची कबुली दिली. चोरट्यांविरुद्ध जळगाव, अकोला, पुणे, अमरावती शहरात महिलांचे दागिने हिसकावण्याचे ३० गुन्हे दाखल आहेत. अतिरिक्त आयुक्त प्रवीणकुमार पाटील, सहायक आयुक्त अप्पासाहेब शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पायगुडे, गुन्हे शाखेचे निरीक्षक विजय खोमणे, हवालदार कुंदन शिंदे, प्रकाश मरगजे, किशोर वळे, अमित सुर्वे, अनिस तांबोळी, दयानंद तेलंगे-पाटील आदींनी ही कारवाई केली.

### सीसीटीव्ही द्वारे चोरट्याचा शोध

» पोलीस उपनिरीक्षक सुनील जगदाळे, चंद्रकांत कामठे यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण तपासासाठी ताब्यात घेतले होते. पोलीस कर्मचारी किशोर वळे यांना चोरट्यांच्या माहिती मिळाली. चोरटे शिवाजीनगर भागातून प्रवासी बसने जळगावला पसार होण्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा लावून चोरट्यांना ताब्यात घेण्यात आले.